प्रत्येक बातमी तुमच्या पर्यंत

PRGI No.MHMAR/25/A2032

दैनिक

महाराष्ट्र चौफेर

maharashtrachaufher@gmail.com

मुख्य संपादक : अबरार मिर्झा | मो.7770060932

Year :1 | Issue No.: 64 | Thursday Date 26 November 2026 | Jalgaon | Price : 5 | Page : 4

वर्ष १ | अंक -६४ | जळगाव | गुरुवार | दि. २६ नोव्हेंबर २०२६ | किंमत ५ रुपये | पृष्ठे ४

मराठखेडे येथे भरदिवसा घरफोडी; सुमारे एक लाख रुपयांचा ऐवज लंपास

पारोळा । राजेंद्र शर्मा

पारोळा तालुक्यातील मराठखेडे येथे आज दि. २५ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते १ वाजेच्या दरम्यान भरदिवसा घरफोडीची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मराठखेडे येथील शेतकरी श्री. तुकाराम पौलाद पाटील यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील जवळपास एक लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, चोरट्यांनी घरात प्रवेश केल्यानंतर आतून दरवाजा बंद केला आणि चोरी करून छताच्या मार्गाने पलायन केल्याची माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चोरीच्या घटनांबाबत चिंता

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये



पावसाचे असमान वितरण, पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी व ग्रामीण नागरिक आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत. शेतीमालाला अपेक्षित भाव न मिळणे, शेतीचा वाढता खर्च, रोजगाराच्या मर्यादित संधी यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ताण निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागात घरफोडी व चोरीच्या घटनांबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढताना दिसत आहे.

शेतकरी दिवसभर शेतात किंवा कामानिमित्त घराबाहेर असतात. याचाच गैरफायदा घेत चोरटे बंद घरांना लक्ष्य करत असल्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. भरदिवसा घरफोडी होणे ही गंभीर बाब असून ग्रामीण भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पोलिसांनी गस्त वाढविण्याची नागरिकांची मागणी

मराठखेडे परिसरातील या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस प्रशासनाने ग्रामीण भागात नियमित गस्त वाढवावी, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवावे तसेच चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. भरदिवसा घडलेल्या या चोरीच्या घटनेचा छडा लावून चोरट्यांना लवकरात लवकर जेरबंद करण्याचे आव्हान आता पोलिसांसमोर आहे.



तापी नदीकाठी अवैध गौण खनिज वाहतुकीवर धडक; चार डंपर, एक पोकलँड आणि जेसीबी जप्त

यावल महसूल विभागाची मोठी कारवाई!

जळगाव । बशीर तडवी

यावल तालुक्यातील पिंपरी शिवारात तापी नदीकाठी अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर यावल तहसील कार्यालयाच्या महसूल विभागाने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत महसूल पथकाने चार मोठे डंपर, एक पोकलँड मशीन आणि एक जेसीबी पकडल्याची माहिती समोर आली आहे.

या कारवाईचे विशेष म्हणजे यावलच्या तहसीलदार श्रीमती मोहनमाला नाझीरकर यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून कारवाई करून घेतली. त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत महसूल विभागाने ही धडक कारवाई केली.

या कारवाईमुळे यावल तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. तापी नदीपात्र व परिसरातील गौण खनिजाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी प्रशासनाने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. (पान ४ वर..)

रावेर तालुक्यात वाळू वाहतुकीचा सुळसुळाट! महसूल प्रशासनाचे नियंत्रण नेमके कुठे?

वाळूच्या प्रत्येक वाहनाकडे परवाना व रॉयल्टी पावती आहे का? अवैध उपसा आणि वाहतुकीची सखोल चौकशी करण्याची नागरिकांची मागणी; रात्रीच्या गस्तीबाबतही प्रश्नचिन्ह!

रावेर । मुबारक तडवी

रावेर तालुक्यात सध्या वाळू वाहतुकीचा विषय पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. शहरापासून ग्रामीण भागापर्यंत विविध रस्त्यांवरून वाळूने भरलेली वाहने सर्रास धावताना दिसत असल्याने या वाहतुकीमागे अधिकृत परवानगी आहे की नियमबाह्य व्यवहार सुरू आहेत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. वाळू वाहतुकीसाठी आवश्यक परवाने, रॉयल्टी पावत्या आणि शासकीय नोंदींची महसूल विभागाकडून काटेकोर तपासणी केली जात आहे का, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे.

वाळू वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहनाकडे नियमानुसार आवश्यक कागदपत्रे असणे बंधनकारक आहे. संबंधित वाहनातील वाळूचा स्रोत, वाहतुकीची परवानगी, रॉयल्टी भरल्याचा पुरावा आणि



वाहतुकीचे प्रमाण यांची पडताळणी होणे आवश्यक आहे. मात्र, रस्त्यांवरून मोठ्या प्रमाणात वाळू वाहतूक होत असल्याचे चित्र दिसत असताना प्रशासनाकडून नेमकी किती तपासणी केली जाते, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे.

यापूर्वीही वृत्तपत्रे आणि विविध वृत्तपोर्टलच्या माध्यमातून वाळू वाहतुकीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. मात्र, काही दिवस चर्चा होते आणि त्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे राहते, अशी नागरिकांची भावना आहे. त्यामुळे आता केवळ आश्वासनांऐवजी प्रत्यक्ष कारवाईची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नदीपात्रातील बेसुमार उपसा पर्यावरणासाठी धोक्याची घंटा!

नदीतील वाळू ही निसर्गाने दिलेली मौल्यवान संपत्ती आहे. तिचा अनियंत्रित उपसा झाल्यास नदीपात्राच्या नैसर्गिक रचनेवर परिणाम होऊ शकतो. भूजल पातळी, पाण्याचा प्रवाह आणि नदीकाठच्या पर्यावरणीय संतुलनावरही त्याचे दुष्परिणाम होण्याची शक्यता असते. आधीच रावेर तालुक्यात पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीचे आव्हान असताना नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

त्यामुळे वाळू उपशासाठी शासनाने निश्चित केलेल्या नियमांचे आणि मर्यादांचे पालन होत आहे की नाही, याची संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करणे गरजेचे आहे.

वाळूच्या प्रत्येक वाहनाचा हिशेब सार्वजनिक करा!

तालुक्यातून वाहतूक होणाऱ्या वाळूच्या प्रत्येक वाहनाची तपासणी करून त्यातील वाळूचे प्रमाण, उपशाचे ठिकाण, वाहतुकीचा परवाना आणि रॉयल्टी भरल्याची पावती यांची पडताळणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शासनाने किती वाळू उपशाला परवानगी दिली? प्रत्यक्षात किती वाळूचा उपसा झाला? किती वाहतुकीची नोंद झाली? आणि शासनाच्या महसुलात किती रक्कम जमा झाली? या सर्व बाबींचा पारदर्शक लेखाजोखा जनतेसमोर मांडण्याची गरज आहे.

केवळ रस्त्यांवर वाहने अडवून तपासणी करण्यापेक्षा वाळू उपशाचे ठिकाण, साठवणूक केंद्रे, वाहतूकदार आणि विक्रीची संपूर्ण साखळी तपासली गेली पाहिजे.

रात्रीच्या वाळू वाहतुकीवर विशेष लक्ष देण्याची गरज!

रात्रीच्या वेळी वाळू वाहतुकीचे प्रमाण वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे महसूल विभागाने विशेष पथक नियुक्त करून रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी. संशयास्पद वाहनांची तपासणी करावी तसेच नदीपात्रातील उपशाच्या ठिकाणांची अचानक पाहणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नियमांचे उल्लंघन करून वाळू उपसा किंवा वाहतूक होत असल्याचे आढळल्यास संबंधित वाहनांवर नियमानुसार जप्ती आणि दंडात्मक कारवाई करावी. तसेच केलेल्या कारवाईचा तपशील सार्वजनिक करावा, अशीही मागणी होत आहे. (पान ४ वर..)